विद्याविकास
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६-२७/४१० दि. १९/१०/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.

**विषय : सन २०२९ पर्यंत महाराष्ट्रातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणासंदर्भात कार्यवाही करणेबाबत.**

**संदर्भ क्र : उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, महाराष्ट्र शासन यांचे क्र. संकीर्ण-२०२६/ई १८०४०७२/वि.शि-५ दि. ०८.१०.२०२६ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

मा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संदर्भ क्र. संकीर्ण-२०२६/इ१८०४०७२/वि शि ५ दि. ०८ ऑक्टोबर, २०२६ रोजीच्या पत्रान्वये, केंद्र शासनाने विविध केंद्रीय व राज्य शासनाच्या विभागांमध्ये समन्वय साधून सन २०२९ पर्यंत संपूर्ण देशातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यानुषंगाने राष्ट्रीय पातळीवर "नशा मुक्त भारत अभियान" प्रभावीपणे राबविले जात आहे.

केंद्र शासनाच्या या धोरणाला गती देण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्याला सन २०२९ पर्यंत पूर्णपणे अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी राज्य शासनाने "सर्वसमावेशक शासकीय दृष्टिकोन" (A Whole-of-Government Approach) विकसित केला आहे. त्याअंतर्गत राज्यातील अवैध अंमली पदार्थाच्या निर्मितीस सहाय्यभूत पिकांची शेती/लागवड, नैसर्गिक व सिंथेटिक अंमली पदार्थांचे उत्पादन, वाहतूक, विक्री व सेवनावर कठोर प्रतिबंध घालणे तसेच व्यापक प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविण्याबाबत कळविण्यात आले आहे.

महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागांनी अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. आपले महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागांनी आपला परिसर 'ड्रग फ्री कॅम्पस' करणे आणि आपल्या महाविद्यालयाचा ५०० मिटरचा परिसर हा 'ड्रग फ्री झोन' म्हणून घोषित करावा.
२. आपले महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थामधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून अंमली पदार्थांचे सेवन व त्याच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती मोहीम राबवावी.
३. आपले महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागांनी आपल्या महाविद्यालयात अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठीचा नोडल अधिकारी नियुक्त करावा.
४. आपले महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागांनी अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करणेबाबतचा प्रगती अहवाल एकत्रित करून मा. संचालक, उच्च व शिक्षण संचालनालय, पुणे यांना पाठवावा.

कळावे, ही विनंती.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४२१,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID : **vishi5.hted-mh@mah.gov.in**

---

क्र. संकीर्ण-२०२६/ ई १८०४०७२ / वि शि ५ दिनांक :- ०८/१०/२०२६

प्रति-

१) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.

२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.

३) संचालक, कला संचालनालय, मुंबई.

४) कुलसचिव, सर्व सार्वजनिक विद्यापीठे.

विषय - **सन २०२९ पर्यंत महाराष्ट्रातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राज्य शासनाचे "A Whole - of- Government Approach" धोरण संदर्भातील गृह विभाग** शासन निर्णय दिनांक १६/०९/२०२६ मधील या विभागाशी संबंधित बाबी संदर्भात कार्यवाही करणे संदर्भात

संदर्भ - १) शासनाचे समक्रमांकाचे दि. १८/०८/२०२६ चे पत्र

२) **कक्ष अधिकारी (विशा३ अ), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे** क्र. संकीर्ण-०७२६/ प्र.क्र.३१२/ विशा-३(अ) दि.१६/०९/२०२६ **चे पत्र (ईऑफीसद्वारे प्राप्त दि.०५/१०/२०२६) व त्यासोबतचा गृह विभाग शासन निर्णय** क्र. संकीर्ण-०७२६/ प्र.क्र.३१२/ विशा-३ (अ) दि. **१६/०९/२०२६**

महोदय,

सन २०२९ पर्यंत महाराष्ट्रातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राज्य शासनाचे "A Whole-of- Government Approach" धोरण संदर्भातील **गृह विभाग शासन निर्णय दिनांक १६ / ०९ / २०२६ संदर्भात संबंधित विभागांनी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत गृह विभागाच्या संदर्भ क्र. २ मध्ये नमूद पत्राद्वारे निदेशित करण्यात आले आहे.**

२. **संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना** सदरहू अनुषंगाने समन्वय राखण्यासाठी **“ नोडल अधिकारी ” म्हणून घोषित करण्यात करण्यात येत आहे.**

३. संदर्भ क्र. २ मध्ये नमूद गृह विभाग शासन निर्णय दिनांक १६/०९/२०२६ मध्ये खालील महत्वाच्या सुचना आहेत :-

अ) सर्व **शैक्षणिक संस्थांचे परिसर 'ड्रग फ्री कॅम्पस' करणे** आणि **कॉलेजांच्या ५०० मीटरचा परिसर 'ड्रग फ्री झोन' त्वरीत घोषित करणे.** (कालमर्यादा दि. ३०/०९/२०२६)

ब) राज्यातील सर्व महाविद्यालय व विद्यापीठांतर्गत **राष्ट्रीय सेवा योजनेच्या** (N. S. S.) **माध्यमातून अंमली पदार्थ सेवन व त्याच्या दुष्परीणामाबाबत जनजागृती मोहीम राबविणे.**

क) सर्व महाविद्यालय/ विद्यापीठांमध्ये **" कॅम्पस समन्वयकांची नियुक्ती " करणे.**

ड) University Grants Commission (UGC) करिता TISS मार्फत ड्रग फ्री कॅम्पस करण्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार करण्यात येत आहेत. तसेच, UG / PG विद्यार्थ्यांकरीता अभ्यासक्रम तयार करण्यात येत आहे. तसेच, विद्यार्थ्यांमध्ये अंमली पदार्थांच्या वापराचे लवकर निदान (Early Detection) होण्यासाठी TISS कडून शिक्षक व प्राचार्य यांच्याकरिता माहिती पुस्तिका तयार करण्यात येत आहे. या बाबींचा वापर करावा.

४. अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन संदर्भातील **कामगिरीचा प्रगती अहवाल सर्व संबंधित यांचेकडून संकलित करुन** संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी **दरवर्षी 'अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स' (ANTF), पुणे यांच्याकडे सादर करावा.**

आपला,

**सोबत** - वरीलप्रमाणे

( प्रविण अकोलकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव -- कक्ष अधिकारी (विशा३ अ), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID : home.spl3a@maharashtra.gov.in

क्रमांक:संकीर्ण-०७२६/प्र.क्र.३१२/विशा-३(अ) दिनांक : १६.०९.२०२६

प्रति,

१) अपर मुख्य सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) अपर मुख्य सचिव, अन्न व औषध प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव,परिवहन व बंदरे विभाग, मंत्रालय,मुंबई.
४) अपर मुख्य सचिव,वन विभाग,मंत्रालय,मुंबई.
५) अपर मुख्य सचिव,कौशल्य,रोजगार,उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव,महसूल विभाग, मंत्रालय,मुंबई.
७) अपर मुख्य सचिव,नगर विकास विभाग-२,मंत्रालय,मुंबई.
८) प्रधान सचिव, क्रीडा व युवक कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०)प्रधान सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
११)प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२)प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३)प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४)सचिव,महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
१५)सचिव, कृषि विभाग, मंत्रालय,मंबई.
१६)सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७)सचिव, ग्रामविकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
१८)सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, मुंबई.
१९)पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२०)विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय :-** सन २०२९ पर्यंत महाराष्ट्रातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राज्य शासनाचे "A Whole-of- Government Approach" धोरण.

**संदर्भ:-** समक्रमांकाचे शासन निर्णय, दि.१६.०९.२०२६

**महोदय,**

सन २०२९ पर्यंत महाराष्ट्रातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राज्य शासनाचे "A Whole-of- Government Approach" धोरण राबविण्यास संदर्भाधीन शासन

निर्णयान्वये मान्यता दिली आहे. सदर शासन निर्णयाची प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

(अविनाश आगळे)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत :- माहितीस्तव अग्रेषित-**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (गृह-ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (गृह-शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. उप सचिव/विशा-३(अ) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती/ विशा-३(अ).

सन २०२९ पर्यंत महाराष्ट्रातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राज्य शासनाचे **"A Whole-of- Government Approach"** धोरण.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-०७२६/प्र.क्र.३१२/विशा-३(अ)**

मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक: १६ सप्टेंबर, २०२६

## प्रस्तावना :-

केंद्र शासनाने विविध केंद्रीय व राज्य शासनाच्या विभागांमध्ये समन्वय साधून सन २०२९ पर्यंत संपूर्ण देशातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यानुषंगाने राष्ट्रीय पातळीवर "नशा मुक्त भारत अभियान" प्रभावीपणे राबविले जात आहे.

केंद्र शासनाच्या या धोरणाला गती देण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्याला सन २०२९ पर्यंत पूर्णपणे अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी राज्य शासनाने "सर्वसमावेशक शासकीय दृष्टिकोन" (A Whole-of-Government Approach) विकसित केला आहे. त्याअंतर्गत राज्यातील अवैध अंमली पदार्थाच्या निर्मितीस सहाय्यभूत पिकांची शेती/लागवड, नैसर्गिक व सिंथेटिक अंमली पदार्थांचे उत्पादन, वाहतूक, विक्री व सेवनावर कठोर प्रतिबंध घालणे तसेच व्यापक प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविणे आवश्यक आहे. या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्य शासनातील संबंधीत सर्व प्रशासकीय विभागांनी "अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF)" कार्यालयासोबत समन्वय साधून आपली जबाबदारी पार पाडणे गरजेचे आहे. त्यानुषंगाने राज्य शासनातील विविध विभागांची जबाबदारी आणि कार्यपद्धती निश्चित करण्याची बाब गृह विभागाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातून २०२९ पर्यंत अंमली पदार्थांचे पूर्णपणे निर्मूलन करण्यासाठी गृह विभागाच्या माध्यमातून विकसित करण्यात आलेल्या "A Whole-of-Government Approach" ची अंमलबजावणी करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. या धोरणांतर्गत अवैध अंमली पदार्थांची शेती/लागवड, नैसर्गिक व सिंथेटिक अंमली पदार्थाचे उत्पादन, वाहतूक, विक्री व सेवनावर प्रतिबंध घालण्याबाबत व अंमली पदार्थाच्या प्रचार व प्रसारास आळा घालण्याकरीता विविध प्रशासकीय विभागांची जबाबदारी आणि कार्ये निश्चित करण्यात येत आहेत.

"A Whole-of-Government Approach" चे चार प्रमुख स्तंभ आहेत.

१. अंमली पदार्थ नियंत्रणाकरीता प्रभावी अंमलबजावणी.
२. अंमली पदार्थ पुरवठ्यात तीव्र घट करणे.
३. अंमली पदार्थांच्या मागणीत प्रभावी घट करणे.
४. व्यसनमुक्ती, उपचार व पुनर्वसन.

## प्रशासकीय विभागांचे कार्य व जबाबदारी-

"A Whole-of-Government Approach" धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने, विविध प्रशासकीय विभागांनी प्रामुख्याने विहित कालमर्यादेत करावयाच्या कार्यवाहीचे खालील मुद्यांना (Action Points) शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यवाही | विभाग | कालमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | मादक द्रव्ये व मनोविकारकारक पदार्थ अधिनियम,१९८५ (NDPS ACT 1985) चे कलम ८ व ४७ नुसार नियमितपणे कार्यवाही करणे. | महसूल विभाग, वन विभाग व कृषी विभाग | निरंतर |
| २ | सिंथेटिक व सेमी-सिंथेटिक अंमली पदार्थ निर्मिती, वितरण, वापर, साठवण व वाहतूक इत्यादिवर परिणामकारक प्रतिबंध आणण्याकरीता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (त्यांचे प्रतिनिधी-ANTF) व अन्न व औषध प्रशासन (FDA), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांच्यामध्ये गोपनीय माहितीची देवाण-घेवाण करण्याकरीता एक यंत्रणा (Forum) विकसीत करणे. | गृह विभाग | ३० सप्टेंबर, २०२६ |
| ३ | इयत्ता ५ वी पासून शालेय अभ्यासक्रमात अंमली पदार्थ जनजागृतीबाबत किमान एक पाठ समाविष्ट करण्याबाबत तातडीने कार्यवाही पूर्ण करावी. | शालेय शिक्षण विभाग | पुढील शैक्षणिक वर्षा पासून (जून २०२७) |
| ४ | "मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा-३" योजना राबविताना अंमली पदार्थ विरोधी जनजागृती या घटकास वाढीव गुणांकन निश्चित करावे. | शालेय शिक्षण विभाग | सप्टेंबर,२०२६ |
| ५ | सर्व शैक्षणिक संस्थाचा परिसर Drug Free Campus ठेवण्याकरीता निकष निश्चित करावे व त्यानुषंगाने Drug Free Campus ठेवण्याकरीता पुढील कार्यवाही सुरू करावी. | उच्च तंत्रशिक्षण विभाग | ३० सप्टेंबर, २०२६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" राबवितांना अंमली पदार्थ विरोधी जनजागृती व अंमली पदार्थमुक्त गाव या संकल्पनेस भरीव गुणांकन निश्चित करावे. | ग्राम विकास विभाग | सप्टेंबर, २०२६ |
| ७ | "माझं गाव, आरोग्य संपन्न गाव" अभियान राबवितांना अंमली पदार्थ विरोधी जनजागृती व अंमली पदार्थमुक्त गाव या संकल्पनेस भरीव गुणांकन निश्चित करावे. | सार्वजनिक आरोग्य विभाग | सप्टेंबर, २०२६ |
| ८ | प्रसारमाध्यमांद्वारे/सोशल मीडियाद्वारे अंमली पदार्थाविरोधात राज्यव्यापी माहिती, शिक्षण आणि संवाद (IEC) द्वारे प्रभावी/परिणामकारक जनजागृती मोहिम राबवावी. | माहिती व जनसंपर्क विभाग | निरंतर |
| ९ | सर्व शैक्षणिक संस्थांचा/ शाळांचा/ महाविद्यालये/ विद्यापीठ यांचा पाचशे मीटर पर्यंतचा परिसर हा अंमली पदार्थ मुक्त परिसर (ड्रग फ्री झोन) ठेवण्याबाबत शालेय शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी गृह विभाग व नगर विकास विभाग यांच्या समन्वयातून विनाविलंब उपाययोजना करणे. | शालेय शिक्षण/ वैद्यकीय शिक्षण / उच्च व तंत्रशिक्षण / गृह विभाग व नगर विकास विभाग | निरंतर |
| १० | केंद्र शासनाच्या नशा मुक्ती/व्यसनमुक्तीच्या अनुषंगाने असलेल्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा व व्याप्ती वाढवावी.<br><br>तसेच, राज्यातील व्यसनमुक्ती केंद्राचे मूल्यांकन व श्रेणी निर्धारीत करण्याकरीता १५ दिवसांत निकष निश्चित करावे.<br><br>त्यानुसार पुढील ३ महिन्यात सर्व व्यसनमुक्ती केंद्राचे /IRCAचे मूल्यांकन करून श्रेणी आधारीत वर्गीकरण करून पुढील आवश्यक कार्यवाही करणे. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | निरंतर<br><br>३० सप्टेंबर, २०२६<br><br>३० नोव्हेंबर, २०२६ |
| ११ | प्रत्येक तालुका व जिल्हास्तरीय शासकीय रूग्णालयात व्यसनाधीन व्यक्तीच्या उपचार व पूनर्वसनाकरीता यंत्रणा विकसीत करणे.<br><br>तसेच, उपचाराची SOP तातडीने निश्चित करावी. | सार्वजनिक आरोग्य विभाग | २८ फेब्रुवारी,२०२७<br><br>३० सप्टेंबर, २०२६ |
| १२ | सर्व वैद्यकीय महाविद्यालयामध्ये व्यसनाधीन व्यक्तींवर उपचार व पुनर्वसन याकरिता जिल्ह्यामधील व्यसनाधीनतेच्या प्रमाणानुसार प्राथम्य निश्चित करून टप्प्या-टप्प्याने पुढील तीन वर्षात Tertiary Care Centre विकसीत करणे. | वैद्यकीय शिक्षण विभाग | ३१ ऑगस्ट, २०२९ (दरवर्षी १/३ प्रमाणात) |

| | | | |
|---|---|---|---|
| | वैद्यकीय महाविद्यालयामधील व्यसनाधीन व्यक्तीवरील नियमित व Tertiary Care Centres मधील उपचाराची SOP तयार करणे. | वैद्यकीय शिक्षण विभाग | ३० सप्टेंबर, २०२६ |
| १३ | सर्व महानगर पालिका क्षेत्रात व्यसनमुक्ती केंद्र, उपचार व पुनर्वसन केंद्र स्थापन करण्याबाबत **धोरण** निश्चित करणे. | नगर विकास विभाग | ३० नोव्हेंबर, २०२६ |
| १४ | बृन्हमुंबई महानगर पालिका क्षेत्राकरीता आधुनिक सुविधांसह परिपूर्ण व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र (Centre of Excellence) पथदर्शी प्रकल्प स्वरूपात प्राथम्याने स्थापन करण्याबाबत **धोरण** निश्चित करणे. | नगर विकास विभाग | ३० नोव्हेंबर, २०२६ |
| १५ | व्यसनमुक्त तरुणांचे पुन्हा व्यसनाच्या आहारी जाण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण, उपजीविकेसाठी सहाय्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून व्यसनमुक्ती केंद्रांशी समन्वय साधून **धोरण** निश्चित करणे. | कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व सामाजिक न्याय विभाग | ३० नोव्हेंबर, २०२६ |
| १६ | NDPS Act अंतर्गत दाखल गुन्ह्यांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी आवश्यकतेनुसार Exclusive NDPS Court ची स्थापन करणे. | विधी व न्याय विभाग | २८ फेब्रुवारी, २०२७ |
| १७ | तसेच, अंमली पदार्थांच्या गुन्ह्यांमध्ये दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी विशेष सरकारी अभियोक्ता यांचे पॅनल नियुक्त करणे. | विधी व न्याय विभाग | ३० नोव्हेंबर, २०२६ |
| १८ | बाल संरक्षण यंत्रणेच्या माध्यमातून असुरक्षित मुले आणि किशोरवयीन मुला मुलींमध्ये अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जागृती करणे व त्यांचे समुपदेशन करण्याबाबत **धोरण** निश्चित करणे. | महिला व बाल विकास विभाग | ३० नोव्हेंबर, २०२६ |
| १९ | Performance Matrix For District NCORD विकसीत करणे व दरवर्षी २६ जून रोजी जिल्ह्यांना अंमली पदार्थ मुक्त उत्कृष्ट जिल्हा पुरस्कार घोषित करणे.<br>(अभियान कालावधी २ ऑक्टोबर, २०२६ ते ३० एप्रिल, २०२७ व पुरस्कार घोषित-२६ जून २०२७) | गृह विभाग | ३० सप्टेंबर, २०२६ |
| २० | ANTF सोबत संबधित प्रशासकीय विभागांनी मंत्रालय स्तरावरुन समन्वय साधण्यासाठी किमान "उप सचिव दर्जाच्या एका नोडल अधिकाऱ्याची" नेमणूक करणे. | सर्व विभाग | ३० सप्टेंबर, २०२६ |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | एआय-सक्षम विश्लेषण, डार्कनेट देखरेख क्षमता, एकात्मिक एनडीपीएस डॅशबोर्ड आणि भविष्यसूचक बुद्धिमत्ता प्रणाली (Predictive Intelligence Systems) विकसित करणे. | गृह विभाग | ३० नोव्हेंबर, २०२६ |

२. तसेच, विविध प्रशासकीय विभागांच्या अन्य जबाबदाऱ्या व कार्ये खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | | विभाग | संबंधीत विभागाने करावायाची कार्य |
|---|---|---|---|
| १ | अंमली पदार्थ नियंत्रणाकरीता प्रभावी अंमलबजावणी | गृह विभाग | • अंमली पदार्थांच्या समुळ उच्चाटनासाठी सर्व संबंधित प्रशासकीय विभागांसोबत समन्वय साधणे. त्याकरीता धोरण निश्चित करणे व वेळोवेळी अंमलबजावणीचा आढावा घेणे.<br>• राज्य शासनाच्या गावपातळीवरील अधिकाऱ्यांनी /कर्मचाऱ्यांनी स्थानिक पोलीसांच्या मदतीने करावयाच्या सामुहिक कार्यवाहीबाबत SOP तयार करणे. |
| | | परिवहन विभाग | • आंतरराज्य व राज्यांतर्गत अंमली पदार्थांच्या अवैध वाहतूकीस प्रतिबंध घालण्यासाठी निगराणी ठेवून ANTF / पोलीस प्रशासन यांच्या समन्वयातून व्यापक प्रतिबंधात्मक मोहीम राबविणे व अंमली पदार्थ वाहतूक होणारे संवेदनशील मार्ग निश्चीत करणे. |
| | | बंदरे विभाग | • समुद्रामार्गे होणाऱ्या अवैध अंमली पदार्थांच्या तस्करी/वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणे.<br>• सीमा शुल्क दल, तटरक्षक दल, नौदल व पोलीस यांच्याशी समन्वय साधून गुप्त माहितीच्या आधारे माल वाहतूक जहाजे व कंटेनर यांची नियमित तपासणी करणे. |
| | | विधी व न्याय विभाग | • साक्षीदारांच्या संरक्षणाची यंत्रणा अधिक मजबूत करणे. |
| २ (अ) | अंमली पदार्थांच्या पुरवठ्यास प्रतिबंध करणे | महसूल विभाग | • अवैध अंमली पदार्थ शेतीचे जिल्हावार अभिलेख ठेवणे व एएनटीएफ व पोलिसांच्या समन्वयाने अवैध अंमली पदार्थ पिके नष्ट करण्याची कारवाई करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | (नैसर्गिकरीत्या उत्पादीत अंमली पदार्थ (गांजा, अफू इत्यादी) | कृषी विभाग | • कृषि विभागामार्फत करण्यात येणाऱ्या Digital Crop Survey च्या माध्यमातून गांजा व अफूच्या पिकांच्या प्रतिमा आढळल्यास, संबंधित पोलीस यंत्रणेला त्याबाबत सूचित करणे.<br>• त्यानुषंगाने, कृषी आयुक्तलयामार्फत SOP तयार करण्यात यावी. |
| | | वन विभाग | • संपूर्ण राज्यातील वनक्षेत्रात, विशेषत: घनदाट जंगल क्षेत्रात सॅटॅलाइट सर्वेक्षण, जीआयएस व ड्रोनच्या सहाय्याने तसेच वनगस्तीच्या माध्यमातून वनजमीनींचे नियतकालिक सर्वेक्षण करणे. |
| २(ब) | कृत्रिमरीत्या निर्मित अंमली पदार्थ (Synthetic Drugs) | अन्न व औषध प्रशासन विभाग | • रासायनिक व कृत्रिम अंमली पदार्थ निर्मितीस Precursor Drug चा होणारा अवैध पुरवठा नियंत्रित करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.<br>• नियंत्रित औषधांची (Scheduled Drug) अवैध विक्री/पुरवठा यास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणे.<br>• Narcotics Control Bureau (NCB) कडून precursor केमिकल्सचा अवैध वापर टाळण्यासाठी code of conduct निर्गमित केले आहे त्याचे एफडीएमार्फत पालन व्हावे.<br>• प्रिकर्सर केमिकल्सची वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी जीपीएस ट्रॅकिंग व यामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांची/ ऑपरेटर्सची पडताळणी अनिवार्य करणे.<br>• टेम्पर इव्हिडेंट पॅकेजिंग व सीलिंग यंत्रणेचा वापर, उत्पादन युनिट्स, गोदामांमध्ये बायोमेट्रिक प्रवेश नियंत्रण प्रणाली, संरक्षण व्यवस्था व २४*७ सीसीटीव्ही निगराणीद्वारे प्रिकर्सर केमिकल्सची सुरक्षित साठवणूक सुनिश्चित करणे. |
| | | उद्योग विभाग | • रासायनिक व कृत्रिम अंमली पदार्थ निर्मितीस Precursor Drug चा होणारा अवैध पुरवठा नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना करणे.<br>• महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) हद्दीतील |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | बंद, बेवारस किंवा कार्यरत नसलेल्या कारखान्यात अवैध अंमली पदार्थ निर्मितीस प्रतिबंध करणे.<br>• प्रिकर्सर, सर्व केमिकल्स यांच्या ऑर्डरची पूर्तता करण्यापूर्वी व्यवसाय परवाने (Business Licenses), जीएसटी कर नोंदणी, कॉर्पोरेट ओळख (Corporate Identity) याबाबत केवायसी KYC अनिवार्य करणे.<br>• खरेदीदारांकडून प्रिकरसर केमिकल्सच्या उचित वापराबाबत अंतिम घोषणापत्रे घेणे.<br>• प्रिकर्सर केमिकल्सची वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी जीपीएस ट्रेकिंग अनिवार्य करणे तसेच, वाहतूक कंत्राटदार, चालक गोदामातील कर्मचारी व लॉजिस्टिक ऑपरेटर्स यांच्या पार्श्वभूमीची पडताळणी व नियतकालिक तपासणी करणे.<br>• प्रिकर्सर केमिकल्सच्या उत्पादन युनिट्स, गोदामांमध्ये बायोमेट्रिक प्रवेश नियंत्रण प्रणाली, संरक्षण व्यवस्था व २४*७ सीसीटीव्ही निगराणीद्वारे प्रिकर्सर केमिकल्सची सुरक्षित साठवणूक सुनिश्चित करणे.<br>• Narcotics Control Bureau (NCB) कडून precursor केमिकलचा अवैध वापर टाळण्यासाठी code of conduct निर्गमित केले आहे त्याचे उद्योग विभागामार्फत पालन व्हावे.<br>• टेम्पर इव्हिडेंट पॅकेजिंग व सीलिंग यंत्रणेचा वापर, उत्पादन युनिट्स, गोदामांमध्ये बायोमेट्रिक प्रवेश नियंत्रण प्रणाली, संरक्षण व्यवस्था व २४*७ सीसीटीव्ही निगराणीद्वारे सुरक्षित साठवणूक सुनिश्चित करणे. |
| ३ | अंमली पदार्थांच्या मागणीत प्रभावी घट करणे | शालेय शिक्षण विभाग | • शालेय शिक्षण विभागाने अभ्यासक्रम सुनिश्चित करतांना अंमली पदार्थांच्या जनजागृती बाबत TISS ने United Nations Childrens Fund (UNICEF) करीता तयार केलेले अभ्यासक्रमाचे Module विचारात घ्यावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • व्यसनाधीन विद्यार्थ्यांची लवकर ओळख व त्यांना अंमली पदार्थ सेवनापासून रोखण्याकरिता शिक्षक व पालकांमध्ये जनजागृती करणे व त्यांना प्रशिक्षण देणे. |
| | | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | • राज्यातील सर्व महाविद्यालय व विद्यापीठा अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) माध्यमातून अंमली पदार्थ सेवन व त्याच्या दुष्परीणामाबाबत जनजागृती मोहीम राबविणे.<br>• सर्व महाविद्यालय/ विद्यापीठांमध्ये कॅम्पस समन्वयकांची नियुक्ती करणे.<br>• University Grants Commission (UGC) करिता TISS मार्फत ड्रग फ्री कॅम्पस करण्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार करण्यात येत आहेत. तसेच, UG /PG विद्यार्थ्यांकरीता अभ्यासक्रम तयार करण्यात येत आहे.<br>तसेच, विद्यार्थ्यामध्ये अंमली पदार्थांच्या वापराचे लवकर निदान (Early Detection) होण्यासाठी TISS कडून शिक्षक व प्राचार्य यांच्याकरिता माहिती पुस्तिका तयार करण्यात येत आहे.<br>उपरोक्त बाबींचा वापर उच्च व तंत्र शिक्षण विभागाने करावा. |
| | | क्रीडा विभाग | • क्रीडा विभागांतर्गत विविध योजना /संस्था/संघटना/स्पर्धा/महोत्सव यांच्या माध्यमातून राज्यातील तरुणांचा खेळाकडे ओढा निर्माण करून त्यांना विविध खेळांमध्ये भाग घेण्यास प्रोत्साहित करावे. तसेच खेळांच्या माध्यमातून अंमली पदार्थ विरोधी व व्यसनमुक्ती बाबत युवकांमध्ये व्यापक जनजागृती करणे. |
| ४ | व्यसनमुक्ती, उपचार व पुनर्वसन | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | • व्यसनमुक्ती केंद्रात उपचारासाठी येणाऱ्या व्यक्तींची संकलीत माहिती (Data Base) ANTF कार्यालयास उपलब्ध करुन देणे.<br>• राज्य व्यसनमुक्ती कृती दलाचे प्रमुख म्हणून एक पूर्णवेळ विशेष अधिकाऱ्याची नियुक्ती करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • व्यसनमुक्ती मार्गावर असलेल्या व्यसनाधीन व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी उपचारानंतरच्या देखभालीकरिता आर्थिक सहाय्य करणे. |
| | | सार्वजनिक आरोग्य विभाग | • व्यसन मुक्ती करीता उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची स्वतंत्र नोंद घेवून संकलीत माहिती (Data Base) ANTF कार्यालयास उपलब्ध करुन देणे. |
| | | वैद्यकीय शिक्षण विभाग | • राज्य व्यसनमुक्ती कृती दलाचे प्रमुख म्हणून एका पूर्णवेळ विशेष वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करणे.<br>• सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कॅम्पस समन्वयकांची नियुक्ती करणे. |

२. सदर धोरणांतर्गत प्रस्तावित उपक्रम प्रामुख्याने विद्यमान योजना, उपलब्ध मनुष्यबळ व मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदींच्या मर्यादेत राबविण्यात येतील. तथापि, सदर धोरणाचा भर निव्वळ अभियोजन नसून व्यसनमुक्ती, उपचार व पुनर्वसन आहे. सबब, या धोरणाची अंमलबजावणी करतांना आवश्यक तेथे संबंधीत प्रशासकीय विभागांनी अतिरिक्त खर्चाबाबत वित्त विभागाची पूर्वसहमती घ्यावी.

३. सर्व प्रशासकीय विभागांच्या नोडल अधिकाऱ्यांनी आपल्या विभागाने महाराष्ट्र अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी केलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीचा अहवाल दरवर्षी अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF),महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाकडे सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९१६१७३३५३३४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YAMUNA
DHANANJAY JADHAV

Digitally signed by YAMUNA DHANANJAY JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, [illegible] postalCode=400032, st=Maharashtra, [illegible] cn=YAMUNA DHANANJAY JADHAV
Date: 2026.09.16 17:35:02 +05'30'

(यमुना जाधव)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (गृह शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मंबई.
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (सर्व विभाग) मंत्रालय, मुंबई.

६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

८. विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स,महाराष्ट्र राज्य, पुणे.

९. निवडनस्ती /विशा-३(अ)